महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजना महाराष्ट्र अंतर्गत गट विकास अधिकारी यांच्या निलंबन निधी निश्चितीबाबत.

**महाराष्ट्र शासन**

नियोजन विभाग

शासन परिपत्रक क्र. रोहयो २०१९/प्र.क्र.५६/रोहयो- २

मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक - २८ जानेवारी, २०२०.

**वाचा** :- १) राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी कायदा-२००५.

२) राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी कायदा मार्गदर्शक सूचना-२००८.

३) शासन परिपत्रक क्र.रोहयो-२०११/प्र.क्र.१६/रोहयो-२, दि.१७ नोव्हेंबर, २०११.

४) शासन निर्णय क्र.मग्रारोहयो २०१२/प्र.क्र.०४/पुनर्बांधणी-३/रोहयो-१, दि.२७/०९/२०१२.

प्रस्तावना:- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना- महाराष्ट्र (MGNREGS) अंतर्गत घेण्यात येणाऱ्या कामांची वेगवेगळया स्तरावरून (कार्यान्वयीन यंत्रणेचे वरिष्ठ अधिकारी, जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त आणि शासन स्तरावरील अधिकारी) तपासणी करतांना अथवा प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तपासणी करतांना विविध प्रकारचे गैरप्रकार आणि अनियमितता झाल्याचे निदर्शनास येते. यामध्ये प्रामुख्याने मंजूर आराखडयानुसार काम न करणे, बोगस हजेरीपट लिहिणे, मजूर उपस्थिती योग्य प्रकारे न नोंदविणे, मोजमाप पुस्तकात नोंदविलेल्या परिमाणापेक्षा व झालेल्या खर्चापेक्षा प्रत्याक्षात कमी परिमाण आढळणे, मजुरा ऐवजी यंत्राद्वारे काम करणे, इत्यादी प्रकारच्या अनियमितता आढळुन येतात.

वरील प्रकरच्या अनियमितता आणि त्रुटीमुळे कामावर अतिप्रदान झाल्याचे आढळुन येते आणि शासकीय निधीचा अपव्यय होतो. परिणामी या सर्व प्रकारास जबाबदार असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांविरूध्द सेवाशर्ती नियमातील तरतुदीनुसार शिस्तभंगाची कार्यवाही करणे शासनास भाग पडते. अतिप्रदान झालेल्या कामाचे निश्चित परिमाण आणि मुल्यांकन ठरविण्यासाठी संयुक्त मोजणी करण्याबाबतच्या सुचना शासनाने वेळोवेळी दिलेल्या आहेत. त्यानुसार संयुक्त मोजणीच्या कार्यपध्दतीचा अवलंब करून संबंधित जिल्हाधिकारी संयुक्त मोजणीचा अहवाल विभागीय आयुक्तांना सादर करून त्यानुसार कर्तव्य व जबाबदारी प्रमाणे निलंबन निधी निश्चिती बाबतची कार्यवाही करण्यात येते.

जबाबदारी निश्चित करताना कर्तव्य जबाबदारी विचारात न घेता सरसकट तांत्रिक अधिकारी व कर्मचारी यांच्या बरोबर गट विकास अधिकारी यांच्यावर सुध्दा निलंबन निधी निश्चितीचे प्रकार राज्यामध्ये मोठया प्रमाणात घडत असल्याची बाब महाराष्ट्र विकास सेवा राजपत्रित अधिकारी

संघटनेने निवेदनाद्वारे शासनाच्या निदर्शनास आणले आहे. त्यामुळे महाराष्ट्र विकास सेवेतील अधिकाऱ्यांवर चांगले काम करून सुध्दा त्यांचा संबंध नसताना तांत्रीक बाबी करीता मुल्यांकनातील फरक म्हणजेच त्यांच्यावर निलंबन निधी निश्चित करून शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येते. याबाबत सुस्पष्टता रहावी तसेच त्यांचे मनोबलाचे खच्चीकरण होऊ नये म्हणून गट विकास अधिकारी यांच्यावरील निलंबन निधी निश्चितीची कार्यवाही रद्द करण्याची बाब शासनाच्या विचारात होती.

परिपत्रक-

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना- महाराष्ट्र (MGNREGS) ही योजना महाराष्ट्रामध्ये सुरू करण्यात आलेली आहे. सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना- महाराष्ट्र (MGNREGS) अंतर्गत निदर्शनास येणारे गैरप्रकार, अनियमितता, अतिप्रदान इत्यादी बाबींच्या अनुषंगाने संबंधीत संयुक्त मोजणी करण्यासाठी मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात येते. त्यामध्ये मुल्यांकन नोंदवही (एम.बी) मध्ये नोंदविण्यात आलेल्या खर्चापेक्षा कामावर कमी खर्च झालेला आहे अथवा मंजुर अंदाजपत्रका प्रमाणे/ परिमाणाप्रमाणे काम न करणे, शासकीय रक्कमेचे नुकसान/अपहार/ अतिप्रदान होणे अशा अनियमितता/ त्रृटी आढळून आल्यास वरील परिपत्रकामधील सुचनेनुसार गैरव्यवहारात गुंतलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यावर निलंबन निधी निश्चित करून त्यांचेवर शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येते. वरील योजने अंतर्गत कामामध्ये आढळून येणारे गैरप्रकार, अनियमितता, अतिप्रदान इत्यादी प्रकरणी निलंबन निधी निश्चित करतांना व जबाबदारी निश्चित होतांना तांत्रिक अधिकाऱ्यांसह प्रशासकीय अधिकारी म्हणुन गट विकास अधिकारी यांच्यावरही जबाबदारी निश्चित करण्यात येते.

गट विकास अधिकारी हे प्रशासकीय पद असल्याने तांत्रिक बाबींमधील अनियमितता/अतिप्रदान/अपहार/नुकसान/त्रृटी/काम मुल्यांकन/फेर मुल्यांकनातील फरक याप्रकरणी निश्चित होणाऱ्या निलबंन निधी बाबत त्यांचेवर जबाबदारी निश्चित होऊ शकत नाही अशी मागणी महाराष्ट्र विकास सेवा राजपत्रित अधिकारी संघटनेने वेळोवेळी केलेली आहे. संघटनेच्या मागणीच्या अनुषंगाने ग्रामविकास व पंचायत राज विभागाने निवेदनामध्ये केलेली मागणी विचारात घेण्याचे अभिप्राय दिले आहेत. तसेच या संदर्भात काही विभागीय आयुक्त यांनीही तसे अभिप्राय शासनाकडे सादर केलेले आहेत. या सर्व बाबी विचारात घेता प्रत्यक्षात गट विकास अधिकारी हे प्रशासकीय पद असल्याने तांत्रिक बाबीमधील अनियमितता /अतिप्रदान/ अपहार/नुकसान/त्रृटी/मुल्यांकन/फेर मुल्यांकनातील फरक/ निश्चित होणाऱ्या निलंबन निधी याबाबत गटविकास अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करणे योग्य होणार नाही. ही बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे. याबाबतीत सुस्पष्टता रहावी म्हणून शासन खालीलप्रमाणे सुचना देत आहे.

१. गट विकास अधिकारी हे तालुकास्तरावरील प्रशासकीय पद असल्याने गट विकास अधिकारी हे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना- महाराष्ट्र (MGNREGS) अंतर्गत फक्त प्रशासकीय बाबींकरीता जबाबदार राहतील.

२. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना- महाराष्ट्र (MGNREGS) अंतर्गत तांत्रिक बाबींमध्ये जसे की मुल्यांकन, फेर मुल्यांकनातील फरक, निलंबन निधी इत्यादी तांत्रिक बाबींकरीता गटविकास अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करण्यात येऊ नये.

गट विकास अधिकारी यांनी त्यांच्या अधिपत्याखाली पार पाडल्या जाणाऱ्या वरील योजना अंतर्गत असलेली त्यांची प्रशासकीय व पर्यवेक्षीय कामे योग्य रितीने होत आहेत याबाबत दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(अ.दा.पठाण)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ (रोजगार हमी योजना समिती) सचिवालय, विधान भवन मुंबई.
२. सचिव, जलसंधारण व मृद संधारण, मंत्रालय, मुंबई.
३. सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. सर्व विभागीय आयुक्त.
५. आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, महाराष्ट्र आयुक्तालय, नागपूर.
६. प्रधान मुख्य वन संरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
७. कृषी आयुक्त, महाराष्ट्र राज्य पुणे.
८. सर्व जिल्हाधिकारी (मुंबई वगळुन)
९. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद.
१०. सर्व उप जिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय.
११. सर्व उप सचिव/ अवर सचिव (रोहयो प्रभाग/नियोजन विभाग)
१२. सर्व कार्यासन अधिकारी (रोहयो प्रभाग/ नियोजन विभाग)
१३. अध्यक्ष/सचिव, महाराष्ट्र विकास सेवा राजपत्रित अधिकारी संघटना.